NRB INDUSTRIAL

NIBL/BSE/NSE/47/2018-19

05th February, 2019

National Stock Exchange Ltd.
Listing Department
Exchange Plaza, 5th Floor,
G Block, Bandra-Kurla Complex
Bandra (East), Mumbai-400051
Fax No.:022-26598237/38

BSE Limited
Listing Department
Sir P.J. Tower, Dalal Street,
Mumbai-400001
Fax No. 022-22723121/3719/2037

Ref. : **BSE Scrip Code: 535458; NSE Symbol: NIBL**

Sub. : **Paper Advertisement**

Dear Sir / Madam,

In accordance with Regulation 47 of SEBI (Listing Obligation and Disclosure Requirements) Regulation, 2015, please find attach paper advertisement published in Tarun Bharat (Marathi) & Financial Express (English) newspaper of the Un- Audited Financial Results for the quarter ended 31st December, 2018 for your kind perusal.

Kindly take the above on record.

Thanking you,

Yours truly,

For NRB Industrial Bearings Limited

Ratika Gandhi
Company Secretary

NRB INDUSTRIAL BEARINGS LTD. MUMBAI

NRB INDUSTRIAL BEARINGS LTD.
REGD. OFFICE : 2ND FLOOR, DHANNUR, 15, SIR P.M. ROAD, FORT, MUMBAI - 400 001. MAHARASHTRA, INDIA.
TEL.: 9122 - 2270 4206 FAX : 9122 - 2270 4207
WEBSITE : http//www.nrbindustrialbearings.com
GSTIN : 27AADCN5657L1ZY
CIN : L29253MH2011PLC213963

आरोग्य

आयुषो वेदः आयुर्वेदः

वैद्य कीर्ती देव

सुप्रजा

भाग-५

आज आपण गर्भाची दर महिन्याला होणारी वाढ, मासानुमासिक वृद्धी याबद्दल जाणून घेऊया. आयुर्वेदशास्त्राने गर्भाची वाढ दर महिन्यात कशी होते, हे सांगून ठेवले आहे. त्याचबरोबर मातेच्या शरीरातलेही बदल सांगितले आहेत. आधी गर्भाची वाढ बघूया.

स्त्री शरीरात गर्भधारणा होते. स्त्रीबीज पुरुषबीज गर्भाशयात एकत्र आल्यावर गर्भधारणा झाली, असे म्हटले जाते. पण, ही गर्भधारणा लगेच कळून येत नाही. काही वेळेस काही शारीरिक बदल, काही सवयींमध्ये बदल घडू लागतो. गर्भधारणा झाल्यापासून प्रसुती होईपर्यंत मासिक पाळी बंद होते. बहुतांशी वेळेस मासिक पाळीची तारीख उलटून गेल्यावरच गर्भधारणा झाली आहे की नाही, हे तपासले जाते. यामध्ये प्राथमिक लघवी परीक्षण (Urine Pregnancy Test) केले जाते. काही वेळेस रक्त तपासणी, सोनोग्राफीही केली जाते. काही वेळेस गर्भ राहिल्यानंतर मळमळणे, उलटी होणे, स्तन जड होणे, तोंडाला चव नसणे, अस्वस्थ वाटणे, अनिच्छा, अनुत्साह इत्यादीपैकी एखादे किंवा सर्वच लक्षणे उद्भवू शकतात. काही वेळेस कोणताच त्रास होत नाही. प्रत्येक शरीराची प्रतिक्रिया ही वेगवेगळी असते. ही लक्षणे असणे चांगले की वाईट, असा जेव्हा प्रश्न माझे रुग्ण दवाखान्यात विचारतात; तेव्हा माझे उत्तर असे असते की, हे बरोबर की चूक, चांगले की वाईट, असे काही नसते. प्रत्येक शरीर एखाद्या परिस्थितीत भिन्न प्रतिक्रिया देते. म्हणजे पहिल्या दिवसापासून उलटी होणे किंवा पूर्ण नऊ महिने काही त्रास न होणे, यात कुठलेच चांगले अथवा वाईट नसते किंवा बरोबर की चूक नसते. पण, गर्भधारणा झाली आहे की नाही, हे खात्रीशीरपणे या लक्षणांवरून सांगणे कठीण होते. म्हणून वर सांगितलेल्या तपासण्या करून घ्याव्यात. शरीरात बदल होतात, तसेच मानसिकरीत्याही काही बदल घडतात. या बदलांबद्दल सविस्तर नंतर बोलू. आज आपण गर्भाची दर महिन्याला होणारी वाढ, मासानुमासिक वृद्धी याबद्दल जाणून घेऊया. आयुर्वेदशास्त्राने गर्भाची वाढ दर महिन्यात कशी होते, हे सांगून ठेवले आहे. त्याचबरोबर मातेच्या शरीरातलेही बदल सांगितले आहेत. आधी गर्भाची वाढ बघूया.

पहिल्या महिन्यात जेव्हा स्त्रीबीज आणि पुरुषबीज एकत्र येतात तेव्हा एक कलल (कालवणासारखे) तयार होते. यामध्ये पेशींचा विशिष्ट आकार नसतो. LOOSELY FORMED MASS OF CELLS WITH INDEFINITE SHAPE हा मांसाचा गोळा अस्थिर असतो. त्याचा आकार (SHAPE + SIZE) बदलत राहतो. हा 'कलल' मनुष्य शरीरासमान अजिबात दिसत नाही.



या स्थितीत कलल हा खूप घन स्वरूपाचा नसतो. या 'कलल'ला 'गर्भ' ही संज्ञा तेव्हाच दिली जाते, जेव्हा त्यात आत्मा प्रविष्ट होतो. म्हणजे फक्त काही पेशी एकत्र येऊन गोळा तयार झाला म्हणजे तो गर्भ होत नाही. यामध्ये शारीरिक घटकांबरोबरच आत्म्याचाही समावेश आहे. थोडक्यात असेही म्हणता येईल की, सर्व गुणसंपन्न आत्मा गर्भावस्थेत सर्व धातूंचे समिश्रणस्वरूप आहे.

दुसऱ्या महिन्यात या 'कलल'स्वरूपी गर्भावर पंचमहाभूतांचा व्यापार होतो. प्रक्रिया होते. याला घनत्व (Solidification) प्राप्त होते. हाडामांसाचा गोळा थोडा अधिक घन होतो. आयुर्वेदानुसार दुसऱ्या महिन्यात गर्भाचे लिंग निश्चित होते. आधुनिक विज्ञानानुसार जेव्हा Conception होते, त्याच वेळेस गर्भाचे लिंग ठरते. पण, आयुर्वेदाने असे सांगितले आहे की, गर्भ राहिल्याक्षणी गर्भात दोन्ही लिंगे सुप्त स्वरूपात उपस्थित असतात. दुसऱ्या महिन्यामध्ये त्यातील एका लिंगाची वाढ होते आणि दुसरे सुप्त राहते. पहिल्या महिन्याच्या 'कलल' स्वरूपावर त्रिदोषांचे (वात-पित्त आणि कफाचे) परिणाम होऊन त्या पेशी अधिक घन होतात. या घन स्वरूपाचा गर्भ ज्या विशिष्ट आकाराचा होतो, (३ आकार होऊ शकतात) त्यानुसार गर्भाचे लिंग ठरते. या घनस्वरूपी गर्भाचे ३ पिंड उत्पन्न होतात. या महिन्यामध्येही हा गर्भ मनुष्य गर्भ आहे असे ओळखता येत नाही. गर्भाला पुरुष गर्भाचे स्वरूप येण्यास तिसरा महिना लागतो. पण, त्या स्वरूपात येण्यासाठी लागणारी सर्व सामुग्री या 'कलल'मध्ये असते. दिवसेंदिवस हा कलल, घन गर्भ बदलत असतो, वाढत असतो. पुरुष स्वरूपाच्याजवळ येत असतो. पण, फक्त शारीरिक बदलच नव्हेत, तर मानसिक जडणघडणही होत असते. म्हणून मातेने सकारात्मक आणि प्रसन्न राहणे अत्यंत गरजेचे आहे. खूप खिन्न मन, तणावग्रस्त असल्यास, चीडचीड, भीती, चिंता इ. मानसभावांचा पोटातील गर्भावर अनिष्ट परिणाम होतो. काही परिणाम या गर्भाला भोगावे लागतात, तर काही बीजस्वरूप गर्भात रुजले जातात आणि त्याची वाढ तिसऱ्या पिढीत होताना दिसते. याबद्दलचे काही शोधनिबंध प्रसिद्ध झाले आहेत. मेडिकल जर्नल्समध्ये तेव्हा फक्त शारीरिक वाढ अपेक्षित न ठेवता सर्वांगीण उत्तम वाढ होण्यासाठी प्रयत्न करावेत.

तिसऱ्या महिन्यात जे तीन घन पिंडांचा गर्भ असतो, तो आता वाढून पाच पिंडांचा होतो. यापासून पुढे दोन हात, दोन पाय आणि डोके निर्माण होते. या गर्भामध्ये ज्ञानेन्द्रियांची निर्मिती सुरू होते. मनुष्याला पाच ज्ञानेन्द्रिये आणि पाच कर्मेन्द्रिये असतात, (ज्ञानेन्द्रिय म्हणजे सेन्स ऑर्गन्स, ज्याने आपल्याला सभोवतालचे ज्ञान होते. जसे कान, त्वचा, डोळे, जीभ आणि नाक) पाच कर्मेन्द्रिये म्हणजे अॅक्शन ऑर्गन्स, ज्याद्वारे शरीर काम करते आणि सगळ्यात महत्त्वाचे इंद्रिय म्हणजे मन. मनाला आयुर्वेदात उभयात्मक इंद्रिय म्हटले आहे. म्हणजे, मन हे ज्ञानेन्द्रियांचेही कार्य करते तसेच कर्मेन्द्रियांचेही करते. उदाहरणार्थ, टीव्ही बघते वेळी त्यात एकाग्र झालो असताना किंवा मोबाईलवर खेळत असताना, दार वाजले, कोणी हाक मारली, तर त्याकडे लक्ष जात नाही. याचाच अर्थ ऐकू आले नाही असा होतो का? तर नाही. ऐकू आलेले असते, पण मोबाईल, टीव्हीमध्ये एकाग्र झाल्यामुळे ऐकणे हे कार्य होऊनसुद्धा त्यावर प्रतिसाद दिला जात नाही. म्हणजेच ज्यात मन असते, त्याचेच ज्ञान होते आणि मनापासून आलेला संदेशानुसार कर्मेन्द्रिये कार्य करत असतात म्हणून मनाला 'उभयात्मक इंद्रिय' म्हटले जाते. म्हणजेच मन हे ज्ञानेन्द्रियाचेही काम करते आणि कर्मेन्द्रियाचेही.

तिसऱ्या महिन्यात गर्भाचे हृदयही कार्यरत होते. म्हणजे स्त्रीशरीरात स्वतःचे हृदय आणि मातेचे हृदय अशी दोन हृदयं सुरू होतात. म्हणून गर्भिणीच्या तिसऱ्या महिन्यात 'दौहृदय'ही म्हटले जाते. या महिन्यापासून गर्भिणीच्या आवडी-निवडीमध्ये फरक पडू लागतो. पण सगळ्यांमध्ये होतो असे नाही. गर्भिणीला जी गोष्ट अतिप्रिय असते (चहा, Icecream, Non-veg. इ.) त्याबद्दल घृणा, तिरस्कार, अरूची उत्पन्न होते आणि काही वेळेस जे आवडत नव्हते, ते खाण्याची इच्छा होते. ही इच्छा केवळ आहारापुरती सीमित नसते. झोप, राहणीमान, पोशाख, विचार इ. गोष्टींमध्ये बदल घडतो. हे बदल म्हणजे गर्भिणीच्यामार्फत गर्भ आपल्या इच्छा-आकांक्षा सांगत असतो, खुणावत असतो. जर शरीरोपयोगी हे 'डोहाळे' असतील, तर ते जरूर पूर्ण करावेत. हे पूर्ण केले नाही, तर गर्भात विकृती (शारीरिक किंवा मानसिक) उत्पन्न होऊ शकते. डोहाळे हे इन्द्रियांमुळे (Sense Organs आणि Action Organs) मुळे उत्पन्न झालेले असतात. गर्भाच्या इच्छा (सुप्त) आहेत. तिसऱ्या महिन्यापासून हा मनुष्य गर्भ असल्याची प्रचिती हळूहळू होऊ लागते.

या पहिल्या तीन महिन्यांमध्ये जी वाढ

होते, ही विविध अंगप्रत्यंगांचे मूळ उत्पन्न होते, या स्वरूपाची असते. या गर्भाचे वजन व आकृती वाढते. पण, पुढील महिन्यांमध्ये होते तितक्या प्रमाणात होत नाही. या तीन महिन्यांमध्ये गर्भ अस्थिर असतो, गर्भपात (Abortion) होण्याची शक्यता अधिक असते. त्यामुळे अति शारीरिक कष्ट आणि मानसिक यातना होतील, अशा गोष्टी टाळाव्यात.

(क्रमशः)

vaidyakirti.deo@gmail.com
९८२०२८६४२९
(लेखिका आयुर्वेदिक कॉस्मेटोलॉजिस्ट व पंचकर्मतज्ज्ञ आहेत.)

NRB INDUSTRIAL

एनआरबी इंडस्ट्रीयल बेअरिंग्ज लिमिटेड

CIN: L29253MH2011PLC213963

नोंदणीकृत कार्यालय : २ रा मजला, धन्नूर, १५, सर पी. एम. रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
दूरध्वनी : ०२२-४५४१ ७५०० फॅक्स क्र. : ०२२-२२७० ४२०७
ईमेल: investorcare@nibl.in | वेबसाईट: www.nrbindustrialbearings.com

३२% — कार्यातून उत्पन्न - ९ एमटीएस डिसें. १८ विरुद्ध ९ एमटीएस डिसें. १७

८% — ईबीआयटीडीए - ९ एमटीएस डिसें. १८ विरुद्ध ९ एमटीएस डिसें. १७

रु. लाखात

डिसेंबर ३१, २०१८ रोजी संपलेल्या तीन आणि नऊ महिन्यांकरिता अलेखापरिक्षित स्वतंत्र वित्तीय परिणामांच्या अहवालाचा निष्कर्ष

तपशील	संपलेले ३ महिने	संपलेले मागील ३ महिने	संपलेले संबंधित ३ महिने	९ महिन्यांचा संपलेला कालावधी	९ महिन्यांचा संपलेला कालावधी	१२ महिन्यांचा संपलेला कालावधी
	३१.१२.१८	३०.०९.१८	३१.१२.१७	३१.१२.१८	३१.१२.१७	३१.०३.१८
	(अलेखापरिक्षित)	(अलेखापरिक्षित)	(अलेखापरिक्षित)	(अलेखापरिक्षित)	(अलेखापरिक्षित)	(लेखापरिक्षित)
कार्यातून एकूण उत्पन्न	१,४५२.९९	१,४२१.८०	१,२६८.६१	४,३२३.५१	३,२७७.५६	४,६१२.८१
करपूर्व तोटा	(३०१.०७)	(३९३.९८)	(४४१.१२)	(१,०४६.८०)	(१,४१६.७७)	(२,०४५.६६)
करपश्चात तोटा	(३०१.०७)	(३९३.९८)	(४४१.१२)	(१,०४६.८०)	(१,४१६.७७)	(२,०४५.६६)
इतर व्यापक उत्पन्न (इसउ)	२.९९	२.९८	३.३३	८.९४	९.९७	११.९२
कालावधीकरिता एकूण व्यापक उत्पन्न	(३०४.०६)	(३९६.९६)	(४३७.७९)	(१,०५५.७४)	(१,४०६.८०)	(२,०५७.५८)
भरणा केलेले सम भाग भांडवल (भागाचे दर्शनी मूल्य रु. २/- प्रत्येकी	४८४.६१	४८४.६१	४८४.६१	४८४.६१	४८४.६१	४८४.६१
रु. २ किंमत असलेल्या भागाचे प्रत्येकी उत्पन्न (वार्षिकीकृत नाही): मूळ आणि सौम्यीकृत	(१.२४)	(१.६२)	(१.८२)	(४.३२)	(५.८५)	(८.४४)

टीप :

१ वरील निष्कर्ष हे सेबी (सुचीबद्धता दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता) नियमन, २०१५ च्या नियमन ३३ अन्वये स्टॉक एक्सचेंजकडे दाखल केलेल्या डिसेंबर ३१, २०१८ रोजी संपलेल्या तीन आणि नऊ महिन्यांकरिता अलेखापरिक्षित स्वतंत्र वित्तीय परिणामाच्या तपशीलवार स्वरुपाचे निष्कर्ष आहेत. अलेखापरिक्षित स्वतंत्र वित्तीय निष्कर्षाचे पूर्ण स्वरूप स्टॉक एक्सचेंज वेबसाईट म्हणजेच www.bseindia.com आणि www.nseindia.com येथे आणि कंपनीची वेबसाईट www.nrbindustrialbearings.com वर देखील उपलब्ध आहे.

२ फेब्रुवारी, ०४, २०१९ रोजी घेण्यात आलेल्या संचालक मंडळाच्या सभेमध्ये मंजूर करण्यात आलेल्या लेखा समितीद्वारे कंपनीच्या डिसेंबर ३१, २०१८ रोजी संपलेल्या तीन आणि नऊ महिन्यांचे वित्तीय निष्कर्षाचे पुनरावलोकन करण्यात आले होते. कंपनीच्या वैधानिक लेखा परिक्षकांनी स्वतंत्र अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षाचे "मर्यादित पुनरावलोकन" आयोजित केले होते.

संचालक मंडळाच्या आदेशाद्वारे

ठिकाण : मुंबई
दिनांक : फेब्रुवारी ०४, २०१९

देवेश सिंग साहनी
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक

मनोवाटा

डॉ. शुभांगी पारकर

तूच तुझा रे सखासोबती

वत्सल सखा दुसरा-तिसरा कोणी नसून आपणच आहोत, हे समजायला आपला पूर्ण जन्म जातो. या प्रिय सख्याबरोबर संवाद साधताच आला नाही, याची जाणीव आपल्यापैकी कित्येकांना होतच नाही. अज्ञानाने म्हणा किंवा दुर्दैवाने म्हणा, पण हे सत्य आहे.

आपण जेव्हा महासंकटात असतो, तेव्हा आपल्याला कोणाची गरज भासते? शत्रुची की मित्राची? याच्या उत्तरासाठी आपल्याला खूप अक्कल वापरण्याची अजिबात गरज नाही. संकटाच्या महाभारतात गरज भासते ती कृष्णाची. आपल्या कल्याणाचा सदैव विचार करणाऱ्या सख्याची. आपल्यापैकी बऱ्याचजणांना, जवळजवळ सर्वांनाच हा सखा शोधायचे अपरिमित कष्ट घ्यावे लागतात. बऱ्याच वेळा अथक प्रयत्नांची पराकष्ठा करूनसुद्धा हा स्नेही कोणाला सापडत नाही. सापडणार तरी कसा? तो जेथे असतो तेथे आपण त्याला शोधत नाही आणि पूर्ण जग धुंडाळत राहतो. याचे कारण हा सखा कोण आहे, याचे मुळातच आपल्याला ज्ञान नसते. खरे तर या अवस्थेलाच आपण 'काखेत कळसा आणि गावाला वळसा' असे म्हणतो. हा वत्सल सखा दुसरा-तिसरा कोणी नसून आपणच आहोत, हे समजायला आपला पूर्ण जन्म जातो. कधी कधी आपले या पृथ्वीतलावरचे अस्तित्त्व पूर्ण होते. पण, आपल्याला या प्रिय सख्याबरोबर संवाद साधताच आला नाही, याची जाणीव आपल्यापैकी कित्येकांना होतच नाही. अज्ञानाने म्हणा किंवा दुर्दैवाने म्हणा, पण हे सत्य आहे.

आपल्यापैकी जवळजवळ प्रत्येकाला स्वाभिमान वा स्वतःबद्दलचा सन्मान महत्त्वाचा वाटतो. कारण, आपला आनंद त्यावर अवलंबून आहे, अशी आपली धारणा असते. अर्थात, आपल्या सन्मानात आपले ऐहिक व मानसिक स्वातंत्र्य आपण अनुभवत असतो. आपली योग्यता व जगातले आपले महत्त्व आपण आपल्या 'स्व' सन्मानातून अनुभवत असतो. तसे पाहिले, तर ते सर्वसामान्यपणे खरे आहे. आपण ताठ मानेने वावरतो, तेव्हा आपली मानसिक ताकद भक्कम आहे, याची प्रचिती आपल्याला येत राहते. पण, जोपर्यंत आपण आपल्या योग्यतेसाठी आपल्या सन्मानावर अवलंबून राहत नाही, तोपर्यंत सगळे आलबेल असते. पण, जेव्हा आपण स्वतःला 'चांगले' वा 'वाईट' या संकल्पनेचा केवळ 'स्व' सन्मानाच्या नजरेतून पाहतो तेव्हा गोष्टी बिघडतात. त्या अर्थाने स्वाभिमान हा आपल्यासाठी पोषक नसतो. कारण, आपण स्वतःला एक इहलोकीचा पामर आहोत, ही गोष्टच नाकारतो. आपण काही चुका माणूस म्हणून करतो किंवा या आपल्याकडून अजाणतेपणी होतात, हे विसरून जातो. यामुळे आपण स्वतःलाच न्याय-अन्यायाच्या, चूक- बरोबरच्या, सत्य-असत्याच्या न्यायालयात उभे करतो. स्वतःशीच निर्दयी वागू लागतो. अशावेळी आपणच हल्लेखोर असतो आणि त्या हल्ल्याचे बळीही ठरतो. खरे तर मानसशास्त्राच्या दृष्टिकोनातून वस्तुनिष्ठ वास्तवातून आपल्या जीवनचक्राकडे पाहणे जास्त उपयुक्त आहे.

समस्यांना ओळखून, त्यांना स्वीकारून आपल्या जीवनाला मार्गी लावण्यात आपल्या जीवनाचा सहिष्णूतात्मक पाया रचला जातो. हा पाया खऱ्या अर्थाने आपली आपल्या जीवनाशी झालेल्या सख्याचे घोतक आहे. हे सख्य दीर्घकालीन असतेच, शिवाय ते खंबीर असते. यात माणसाला जीवनातील नकारात्मक पैलूंची जाणीव असल्यामुळे ते लपविण्याची गरज भासत नाही. जीवनाच्या अनपेक्षित जेरीत आणणाऱ्या अनुभवाला आपण स्वतः तर आत्मविश्वासाने सामोरे जातोच, शिवाय जगासमोरसुद्धा कणखरपणे उभे राहतो. अशावेळी केवळ आत्मविश्वास नाही, तर आपण एक पामर आहोत, यामुळे आपत्याही काही मर्यादा आहेत, हे आपण समजून घेतो. माणूसपणाच्या मर्यादा जेव्हा माणसाला समजतात, तेव्हाच त्याला स्वतःबद्दल जितका आपलेपणा वाटतो, तितकाच तो दुसऱ्याबद्दल वाटतो. आपण असे म्हणतो की, दुसऱ्याचे दुःख समजायला आपल्या स्वतःला ते दुःख अनुभवायला यावे लागते. खरे तर यात तथ्य नाही. दुःखाची व्यक्तता आणि भाषा, आविर्भाव वेगवेगळे असतात. पण, त्याचा अव्यक्त गाभा मात्र समान असतो. हा अव्यक्त गाभा समजून घेणाऱ्याकडे मात्र माणुसकी असते. या माणुसकीत माणसाबद्दलचा विश्वास औदार्य, सुरक्षिततेची भावना, सहचार्य या सर्वांचा सहभाग आहे. जोपर्यंत प्रेमाची व दयेची भाषा माणसाच्या अंतर्मनात वसलेली असते, तोपर्यंत त्याच्या भावविश्वात विश्वबंधुत्त्वाची भावना वस्तीला असते. अशावेळी माणसाला या जगातील कायमच अस्तित्त्वात असणारी माणुसकी कायम अनुभवता येईलच.

...is Notice is also available on the website of the Company at www. Haldynglass.com and on the website of the Stock Exchange, BSE Limited at www.bseindia.com

For Haldyn Glass Limited
A. A. Lambay
Company Secretary

Place : Mumbai
Date : February 04, 2019

GLASS, WITH CARE

Place: Bengaluru
Date : February 04, 2019

Form No. CAA. 2

[Pursuant to section 230(3) of the Companies Act, 2013 and rules 6 and 7 of the Companies (Compromise, Arrangements and Amalgamations) Rules, 2016]

CA (CAA) 12 of 2019

...elspun India Limited, a company incorporated under the provisions ...the Companies Act, 1956 and having its registered office at Welspun ...y, Village Versamedi, Taluka Anjar, Dist. Kutch, Gujarat-370110 }...... Applicant Company

...OTICE AND ADVERTISEMENT OF NOTICE OF MEETINGS OF THE EQUITY SHAREHOLDERS, SECURED CREDITORS AND UNSECURED CREDITORS OF THE APPLICANT COMPANY

...tice is hereby given that by an order dated the 18th January, 2019 the Ahmedabad Bench o... National Company Law Tribunal (**'NCLT' or 'Tribunal'**) has directed separate meetings to be ...d of the equity shareholders, secured creditors and unsecured creditors of the Applican... ...mpany for the purpose of considering, and if thought fit, approving with or without modification(s) ... proposed amalgamation embodied in the Scheme of Amalgamation of Prasert Multiventur... ...ate Limited ("PMPL" or "the Transferor Company") with Welspun India Limited ("WIL" or "th... ...nsferee Company") and their respective shareholders and creditors ('the Scheme').

...ursuance of the said order and as directed therein, further notice is hereby given that separat... ...etings of the equity shareholders, secured creditors and unsecured creditors of the Applican... ...mpany will be held as under, at which time and place the said equity shareholders, secure... ...ditors and unsecured creditors are requested to attend.

...o.	Class of Meetings	Date of Meetings	Time (IST)	Place of meeting
	Equity Shareholders	Friday, the 8th March, 2019	10.00 a.m.	Welspun City, Villag... Versamedi Taluk... Anjar, Dist Kutc... Gujarat - 370110
	Secured Creditors		12.00 p.m. or as soon as the meeting of Equity Shareholders is concluded, whichever is later	
	Unsecured Creditors		2.00 p.m. or as soon as the meeting of Secured Creditors is concluded, whichever is later	

...es of the said Scheme and of the statement under Section 230 of the Companies Act, 201... ...e obtained free of charge at the registered office of the Applicant Company and/ or at th... ...of its Advocates, Raval & Raval Advocates having their office at 21-23, Laxmi Chambers ...Old High Court, Ahmedabad - 380014. Person(s) entitled to attend and vote at the meeting ...vote in person or by proxy, provided that all proxies in the prescribed form are deposited a... ...gistered office of the Applicant Company at Welspun City, Village Versamedi, Taluka Anja... ...utch, Gujarat - 370110 not later than 48 hours before the scheduled time of the commencemen... ...aforesaid meeting.

NRB INDUSTRIAL BEARINGS LIMITED

NRB INDUSTRIAL

CIN: L29253MH2011PLC213963
Regd. Office: 2nd floor, Dhannur, 15, Sir P. M. Road, Fort, Mumbai – 400 001
Tel.: 022-4541 7500 Fax No.: 022-2270 4207
Email: investorcare@nibl.in Website: www.nrbindustrialbearings.com

32 %
Income from Operations - 9 Mts Dec 18 vs 9 Mts Dec 17

8 %
EBITDA - 9 Mts Dec 18 Vs 9 Mts Dec 17

Rs. in Lacs

Extract of Statement of Unaudited Standalone Financial Results for the Three and Nine Months ended December 31, 2018 .

Particulars	3 months ended	Preceding 3 months ended	Corresponding 3 months ended	Year to date 9 months ended	Year to date 9 months ended	Year to date 12 months ended
	31.12.18	30.09.18	31.12.17	31.12.18	31.12.17	31.03.18
	(Unaudited)	(Unaudited)	(Unaudited)	(Unaudited)	(Unaudited)	(Audited)
Total income from operations	1,452.99	1,421.80	1,268.61	4,323.51	3,277.56	4,612.81
Loss before tax	(301.07)	(393.98)	(441.12)	(1,046.80)	(1,416.77)	(2,045.66)
Loss after tax	(301.07)	(393.98)	(441.12)	(1,046.80)	(1,416.77)	(2,045.66)
Other Comprehensive Income (OCI)	2.99	2.98	3.33	8.94	9.97	11.92
Total Comprehensive Income for the period	(304.06)	(396.96)	(437.79)	(1,055.74)	(1,406.80)	(2,057.58)
Paid-up equity share capital (Face value of the share Rs. 2/- each)	484.61	484.61	484.61	484.61	484.61	484.61
Earnings per share of Rs. 2 each:(not annualised):						
Basic and Diluted (In Rs.)	(1.24)	(1.62)	(1.82)	(4.32)	(5.85)	(8.44)

Note:

1 The above is an extract of the detailed format of Statement of Unaudited Standalone Financial Results for the Three and Nine months ended December 31, 2018 , filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Unaudited Standalone Financial Results are available on the Stock Exchange websites viz www.bseindia.com and www.nseindia.com and also on the Company's website www.nrbindustrialbearings.com.

2 The above financial results of the Company for three and nine months ended December 31, 2018 were reviewed by the Audit Committee, approved by the Board of Directors at its meeting held on February 04, 2019 . The Statutory Auditors of the Company have conducted a 'Limited Review' of the Standalone Unaudited Financial Results.

By Order of the Board of Directors

Place : Mumbai
Date : February 04, 2019

Devesh Singh Sahney
Chairman and Managing Director